# सोयाबीन काढणीसाठी हातमोजांचे वाटप

## कृषी विज्ञान केंद्र, पोखरणी यांच्या वतीने महिलांसाठी प्रात्यक्षिक

**नांदेड, ता. १२ :** सध्या सोयाबीन काढणीचा हंगाम सुरू असून महिलांचा शेतीतील योगदान महत्त्वपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विज्ञान केंद्र, पोखरणी यांच्या वतीने सोयाबीन काढणीचे प्रात्यक्षिक आणि महिलांसाठी हातमोजे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात ग्रहविज्ञान तज्ज्ञ प्रा. अलका पवळे यांनी उपस्थित महिलांना शेतीत सुधारित तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी सोयाबीन काढणी करताना हातमोजे वापरण्याचे महत्त्व पटवून दिले. ज्यामुळे हातांना त्रास होणार नाही. तसेच काम अधिक वेगाने पूर्ण करता येईल. याशिवाय महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेऊन सकस आहार घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्रात्यक्षिका दरम्यान महिलांना हातमोजे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, डॉ. महेश आंबोरे, प्रा. राजीव इंगोले यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा प्रतिसाद मिळाला.




**नांदेड :** प्रात्यक्षिक कार्यक्रमाला उपस्थित डॉ. देविकांत देशमुख, डॉ. महेश आंबोरे, राजीव इंगोले, प्रा. अलका पवळे व शेतमजूर महिला.